**महाराष्ट्र शासन**
**इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था**
**(वनार्टी), महाराष्ट्र राज्य,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन,** 3 **रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर** -440022
**Website :** www.vanarti.in **CIN: U84120MH2026NPL466492** **ईमेल-** : vanarti.info@gmail.com

जा .क्र.वनार्टी /नागपूर/आस्था/६२८/२०२६-२७ दिनांक :-१४/०७/२०२६

# कार्यालयीन सूचना

**"व्हिडीओ निर्मिती, व्हिडीओग्राफी, पोस्ट-प्रोडक्शन, एडिटिंग व डिजिटल मीडिया सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी अनुभवी सोशल मीडिया इन्फ्लुएंसर संस्थांकडून दरपत्रके मागविण्याबाबत."**

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) यांच्या विविध योजना, उपक्रम, प्रशिक्षण कार्यक्रम, यशोगाथा, प्रेरणादायी कथा, जनजागृतीपर व्हिडीओ, प्रबोधनपर व्याख्याने, तज्ज्ञांच्या मुलाखती तसेच संस्थेच्या कार्याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी दर्जेदार **व्हिडीओ निर्मिती, चित्रीकरण, एडिटिंग व डिजिटल मीडिया व्यवस्थापन सेवा** उपलब्ध करून घेण्यात येणार आहेत.

यासाठी अनुभवी व सक्षम व्हिडीओग्राफी, एडिटिंग व डिजिटल मीडिया सेवा पुरविणाऱ्या संस्थांकडून खालीलप्रमाणे **प्रति मिनिट एकत्रित दरपत्रक** मागविण्यात येत आहेत.

त्यानुसार इच्छुक व अनुभवी सोशल मीडिया इन्फ्लुएंसर संस्थांनी खालीलप्रमाणे सेवा पुरविण्यासाठी आपले दरपत्रक सादर करावे.

## दरपत्रक सादर करण्याचा नमुना

| अ.क्र. | सेवेचे विवरण | प्रति मिनिट एकत्रित दर (रु.) |
|---|---|---|
| १ | व्हिडीओ चित्रीकरण, ऑडिओ रेकॉर्डिंग, प्रकाशयोजना, एडिटिंग, ग्राफिक्स, उपशीर्षके, Shorts/Reels निर्मिती, डॉक्युमेंट्री, लाइफ स्टोरी आणि सक्सेस स्टोरी, अंतिम डिलिव्हरी व डिजिटल मीडिया सेवा | |

**कामाचा विषय व स्वरूप :**

1. **व्हिडीओ व ध्वनी (ऑडिओ) ध्वनिमुद्रण :**
   - दर्जेदार शैक्षणिक/प्रशिक्षणात्मक व्हिडीओचे चित्रीकरण करणे.
   - आवश्यकतेनुसार मल्टी-कॅमेरा सेटअप (FHD/4K) वापरणे.
   - सुसज्ज प्रकाशयोजना व आवश्यक पार्श्वभूमी साहित्य उपलब्ध करून देणे.

- स्पष्ट ध्वनीसाठी उच्च दर्जाचे माईक व ध्वनी उपकरणांचा वापर करणे.
- संस्थेच्या परिसरात आवश्यकतेनुसार प्रत्यक्ष चित्रीकरण करणे.

2. **एडिटिंग व पोस्ट-प्रोडक्शन :**
   - मल्टी-कॅमेरा एडिटिंग, ट्रांझिशन्स व आवश्यक व्हिज्युअल इफेक्ट्सचा वापर.
   - स्लाईड्स, ग्राफिक्स, स्क्रीन शेअर, लोगो ॲनिमेशन, शीर्षक व पार्श्वसंगीत समाविष्ट करणे.
   - मराठी/इंग्रजी उपशीर्षकांचा आवश्यकतेनुसार समावेश.
   - कलर ग्रेडिंग व इतर तांत्रिक सुधारणा करून अंतिम व्हिडीओ उपलब्ध करून देणे.
   - MP4/MOV स्वरूपात व्हिडीओ उपलब्ध करून देणे.

**तांत्रिक तपशील :**

**व्हिडीओ :**

- किमान रिझोल्यूशन : 4K (3840x2160) किंवा Full HD (1920x1080).
- फाईल स्वरूप : MP4 (H.264).
- मल्टी-अँगल चित्रीकरणासाठी आवश्यक कॅमेरा सुविधा.

**ऑडिओ :**

- वायरलेस लॅपेल/डेस्कटॉप/दिशात्मक मायक्रोफोन.
- उच्च दर्जाची ध्वनी गुणवत्ता.

**प्रकाशयोजना :**

- LED पॅनेल/सॉफ्टबॉक्सद्वारे आवश्यक प्रकाशयोजना.
- ॲडजस्टेबल रंगतापमान व ब्राइटनेस सुविधा.

**एडिटिंग व डिलिव्हरी :**

- मल्टी-लेयर एडिटिंग व ॲनिमेटेड घटकांचा वापर.
- उपशीर्षकांचा समावेश.
- Google Drive/हार्ड डिस्कद्वारे अंतिम फाईल्स उपलब्ध करून देणे.
- आवश्यकतेनुसार एडिट प्रोजेक्ट फाईल्स उपलब्ध करून देणे.

**कालावधी व अपेक्षित उत्पादन :**

- कामाचा कालावधी : 11 महिने (आवश्यकतेनुसार मुदतवाढ देता येईल).
- व्हिडीओची भाषा : मुख्यतः मराठी, हिन्दी व इंग्रजी.

**अटी व शर्ती :**

1. विहित कालावधीत व्हिडीओ तयार करून सादर करणे बंधनकारक राहील.
2. काम समाधानकारकरीत्या पूर्ण झाल्यानंतरच देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
3. लेखा प्रक्रियेमुळे होणाऱ्या विलंबासाठी कोणतेही व्याज देय राहणार नाही.
4. शासन नियमानुसार लागू असलेली GST/TDS कपात देयकातून करण्यात येईल.

5. संस्थेने यापूर्वी केलेल्या तत्सम कामाचा अनुभव व नमुना कामाची माहिती सादर करणे आवश्यक राहील.
6. प्राप्त दरपत्रकांपैकी गुणवत्ता, अनुभव व आर्थिक बाबींचा विचार करून योग्य संस्थेची निवड करण्यात येईल.

सदर इच्छुक संस्थांनी आपले दरपत्रक, अनुभव प्रमाणपत्रे व आवश्यक कागदपत्रांसह दिनांक २२/०७/२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज/दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

**स्वा**

**(प्रशांत वावगे)**

व्यवस्थापकीय संचालक (प्र.)

वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था

(वनार्टी) नागपूर